# देहुरोड पोलीस स्टेशन
## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता:-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.
फोन नं.०२०-२७६७१२८८
ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in


**प्रेसनोट दिनांक- २०/०९/२०२४**

## आरोपीच्या बहीणीशी अनैतिक संबंधच्या कारणावरून तरूणाचा खुन करणाऱ्यांना देहूरोड पोलीसांकडुन दोन तासात अटक

दिनांक २०/०९/२०२४ रोजी फिर्यादी नामे जोगिंदर पालीराम लुक्कड, वय ४६ वर्षे, रा. देहूरोड, पुणे यांनी फिर्याद दिली की, त्यांचा मुलगा अजय लुक्कड वय २१ वर्षे यास त्याची प्रेयसीचा भाऊ नामे कुणाल चंदु सकट, रा. देहूरोड, पुणे याने त्याचे साथीदार प्रेम सचिन मोरे व रोहित बजरंग सकट यांच्या मदतीने त्यास देहूरोड हद्दीतील ट्राय जेसस चर्च मागील डोंगरावरुन खदानीत फेकुण देवुन जिवे ठार मारले अशी फिर्याद दिल्याने त्यांचे तक्रारीवरून देहूरोड पो.स्टे.गुरजि नं.४२५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर खुनाचा गंभीर गुन्हा दाखल होताच वरिष्ठांच्या आदेशाने देहूरोड पोलीस ठाणे येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांची दोन पथके तयार करून त्यांना आरोपींचा शोध घेणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. सदर पथकाने घटनास्थळ तसेच आरोपीतांचे राहते घराचे परिसरातील आरोपींचे ठावठिकाणाबाबत गोपणीयरित्या माहिती गोळा करत असतना तपास पथकातील पोलीस अंमलदार प्रशांत माळी, केतन कानगुडे व शुभम बावणकर यांना गोपणीय बातमी मिळाली की, आरोपी लातुर येथे पळुन जाण्याच्या तयारीत आहे आरोपी पिंपरी येथील नेहरूगनर व भिमनगर येथे असल्याची गोपणीय बातमी मिलल्याने आरोपीना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्ह्याचे अनुषंगाने सखोल तपास केला असता त्यांनी सदर खुनाचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपी नामे कुणाल चंदु सकट याच्याकडे सखोल तपास केला असता त्याने नमुद गुन्ह्यातील मयत अजय लुक्कड याचे त्याचे बहिणीसोबत अनैतिक संबंध होते त्याचा राग मनात धरून त्याचे साथीदारांच्या मदतीने कट रचुन मयतास देहूरोड येथील ट्राय जेसस चर्च मागील डोंगरावर घेवुन जावुन प्रथम त्याचा गळा हाताने आवळुन त्यानंतर त्यास उंच डोंगरावरुन खदानीमध्ये फेकुण त्याचा खुन केल्याचे सांगितले. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी नामे १) कुणाल चुंद सकट, वय १८ वर्षे, रा देहूरोड, पुणे २) प्रेम सचिन मोरे, वय १९ वर्षे रा. भिमनगर, पिंपरी पुणे यांना अटक केली आहे. अटक आरोपीतांस मा. न्यायालयात हजर केले असता त्यांची दिनांक २५/०९/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली असुन अधिक तपास पोनि(गुन्हे) वाकसे करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा.पोलीस सह आयुक्त श्री. शशीकांत महावरकर सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ—२ विशाल गायकवाड सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. देवीदास घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, श्री. विजयकुमार वाकसे, पोनि गुन्हे यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सोहन धोत्रे, पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोलीस अंमलदार किरण खेडकर, बाळासाहेब विधाते, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, युवराज माने, शुभम बावनकर, कैलास उल्हारे, खंडु विरणक, मंगेश लोखंडे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(विशाल गायकवाड)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-२,पिंपरी-चिंचवड.**